नि.दि.दा. क्र. १४/२०१८
तेजराम -वि.- कृष्णा
नि.क्र. ५२

**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

माझे नांव : किर्तीका राजेश नेवारे

वय : ४३ वर्षे, कामधंदा : निमतानदार

राहणार : भुमि अभिलेख कार्यालय, लाखांदुर, ता. लाखांदुर, जि.भंडारा.

**वादी साक्षदार क्र. ३ चे सरतपास वकील श्री वाय.एच.उपराडे यांच्या मार्फत शपथेवर सुरु**

सन २०१९ मध्ये मी भुमिअभिलेख कार्यालय, आमगांव येथे निमतावनदार क्र. १ म्हणून कार्यरत होते. त्यावेळी न्यायालयातर्फे आमच्या कार्यालयाला मोजणी करण्याबाबत रिट प्राप्त झाले होते. त्याचा मोजणी मामला क्रमांक ०४/२०१९, अतितातडी कोर्ट कमिशन असे नोंद झाले होते. त्यावेळी मोजणीदार म्हणून माझी नेमणूक करण्यात आली होती. त्यावेळी कार्यालयाकडून सबंधीत दस्तऐवज मला मिळालेले होते. मी त्यानंतर वादी व प्रतिवादी तसेच लगत लागूदार यांना नोटीस पाठविल्या. मी दिनांक १८/०७/२०१९ रोजी मोजणी करण्याचे कळविले. दिनांक १८/०७/२०१९ रोजी मोजणी साहित्यासह मिळकतीवर हजर झाले. मोजणीच्या वेळी तेजराम तुळशीराम वाढई, लोकेश तेजराम वाढई, कृष्णा सितकु फुंडे, मनोज लक्ष्मणराव ब्राम्हणकर, दिवाकर गणपत चुटे, मारोती दयाराम पाथोडे, पांडुरंग तुकाराम चुटे, अशोक तुकाराम ब्राम्हणकर, कृष्णा श्रीराम शिवणकर, चैतराम रतिराम आगरे हे हजर होते. मी गट क्रमांक ३३६ ची मोजणी केली. त्या गट नंबर मध्ये ३३६/१ व ३३६/२ असे पोट हिस्से आहेत. गट क्रमांक ३३६/१ चा क्षेत्र ०.७४ हे.आर. आहे. सदर मिळकती प्रतिवादी याच्या नावाने आहे. गट क्रमांक ३३६/२ चा क्षेत्र ०.१० हे.आर. आहे. सदर मिळकत ही वादीच्या नावाने आहे. मोजणी मध्ये वादीच्या वहिवाटीला ०.०९ हे.आर. ऐवढे क्षेत्र दिसून आले. वादीच्या वहिवाटीला ०.०१ हे.आर. क्षेत्र कमी दिसून आले. प्रतिवादीच्या वहिवाटीला ०.७५ हे.आर. क्षेत्र दिसून आहे. प्रतिवादीच्या वहिवाटीला ०.०१ हे.आर. क्षेत्र जास्त दिसून आले. सदरचा नकाशा हा मौक्यावर तयार केला आहे. जे मोजणी करीता हजर होते त्यांचे स्वाक्षरी घेण्यात आली. मी नकाशा मध्ये वादी व प्रतिवादी यांची हद्दीच्या खुणा दाखवून ताबा वेगवेगळा दाखविला आहे. वादी व प्रतिवादी यांनी कालवा जागेवर अतिक्रमण केल्याचे नकाशामध्ये दर्शविले आहे. मी त्याचा अहवाल तयार करुन कार्यालयामार्फत न्यायालयात सादर केला. आता मला अभिलेखावरील नकाशाच्या क प्रत दाखविली. सदर नकाशा मी अ प्रत वरुन तयार केलेला आहे. मी अ प्रत आज रोजी न्यायालयात सोबत आणलेली आहे. क प्रत मधील नकाशा हा अ प्रत प्रमाणे आहे. नकाशा मधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यास **निशाणी क्र. ५३** देण्यात येते. मी त्याचे सोबत दाखल करण्यात आलेला अहवाल मला दाखविला. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यास **नि.क्र. ५४** देण्यात येते. नकाशा

केल्यानंतर वादीचे ०.०१ हे.आर. क्षेत्र प्रतिवादीकडे आहे असे दिसून आले. प्रतिवादी यांना सदरचे क्षेत्र वादी यांना देण्याबाबत सांगितले असता त्यांनी नकार दिला. मी तसा जवाब नोंदविला व स्वाक्षरी घेतली.

**सरतपास पुर्ण**

**[ मध्यान्न वेळ झाल्याने उलटतपास दुपारपर्यंत तहकूब]**

**उलटतपास प्रतीवादी तर्फे वकील श्री एच. आर. गूप्ता यांच्या मार्फत-**

मी सरतपासामध्ये लगत धारकांना नोटीस पाठविल्या असे कथन केलेले आहे ते नोटीस पाठविल्याचे अभिलेख मी आज रोजी माझ्या सोबत आणलेले नाहीत. मी ते न्यायालयात दाखल करु शकते.

**(प्रतिवादी तर्फे विधीज्ञ यांनी नोटीस पाठवल्याचा अभिलेख महत्त्वाचा आहे असे कथन केले. वाद विषयाचे अवलोकन केले असता सदरचा अभिलेख न्यायालयासमोर येणे गरजेचे दिसून येते. त्यामुळे सदरची कागदपत्रे दाखल करण्याकरीता उलटतपास पुढील दिनांकापर्यंत तहकूब करण्यात येतो.)**

**आमगांव** **(समीर गोपाळ गुणारी)**

**दिनांक : २४/०६/२०२५** **दिवाणी न्यायाधिश क. स्तर, आमगांव**

नि.दि.दा. क्र. १४/२०१८
तेजराम -वि.- कृष्णा
नि.क्र. ५२

**उलटतपास प्रतीवादी तर्फे वकील श्री एच. आर. गूप्ता यांच्या मार्फत पुन्हा सुरु-**

मी नोटीस पाठविल्याचे अभिलेख आज रोजी न्यायालयात आणलेले आहेत. माझ्या अभिलेखानुसार मी कृष्णा सितकु फुंडे, तेजराम तुळशीराम वाढई, पाठबंधारे विभाग, टेकचंद नारायण बावणथडे यांना नोटीस पाठवली होती. टेकचंद नारायण बावनथडे हा मोजणीच्या वेळी हजर असल्याबाबत माझ्या अभिलेखानुसार दिसून येत नाही. मोजणीच्या वेळी पाठबंधारे विभागाकडून अधिकारी अथवा कर्मचारी हजर नव्हता. टेकचंद बावणथडे व पाठबंधारे विभाग यांना पाठविलेली नोटीस मिळाली किंवा नाही याबाबतची पोच पावती आमच्या अभिलेखावर आहे किंवा कसे हे मला माहिती नाही. मी मोजणी करण्यापुर्वी ज्या लोकांना नोटीस पाठविल्या त्या लोकांना त्या मिळाल्या किंवा कसे याची खातरजमा केली नाही. नोटीस वर गावठान आबादी असे नमुद आहे परंतू त्याबाबत कोणत्याही संबंधीत अधिका-यांना नोटीस पाठविलेले नाही. वादीचे ०.०१ हे आर क्षेत्र प्रतिवादी कडे आहे असे दिसून आल्यानंतर प्रतिवादी यांना सदरचे क्षेत्र वादी यांना देण्याबाबत सांगीतले या माझ्या कथनाबाबत न्यायालयाने मला कब्जा देण्याबाबत आदेशीत केलेले नव्हते. मोजणी केली त्या ठिकाणचा नहरचा गट क्र. काय होता व त्याचे क्षेत्र किती होते हे मला माहिती नाही. नहर मधील किती क्षेत्र अतिक्रमण मध्ये गेलेले आहे हे मला सांगता येणार नाही. मोजणी ठिकाणावरील रिकामी जागा नहर मध्ये येते किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. नहर जवळील रिकामी जागा सरकारी आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. प्रतिवादी कृष्णा फुंडे यांचे नहराचे जागेवर ०.०४५ हे आर क्षेत्र निळया रंगाने दर्शविले असुन त्यामध्ये त्यांची अधिकची ताबा वहिवाट दिसुन आली असे मी माझ्या उपलब्ध अभिलेखावरुन नमुद केले. माझ्या नकाशानुसार व अभिलेखानुसार वादीने भगव्या रंगाने दर्शविलेल्या ०.०७ हे आर क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे दिसून आले. सदरचे क्षेत्र खाली करुन देण्याबाबत मी वादीला सांगीतले नाही. ती जागा पाठबंधारेची असल्याने मी तसे सांगीतले नाही. मला माझ्या अभिलेखावरील मुळ नकाशा वरुन मी नहरची जागा दाखविली. हे म्हणणे खरे नाही की, मी नकाशा खुलासा क्रमांक १ ते ४ हे खोटे नमुद केलेले आहे. मी संपुर्ण गट क्र. ३३६ ची मोजणी केली. हद्दीचा मुळ दगड चांदागोटा मला तेथे दिसून आला नाही. मोजणी करण्याकरीता हद्दीचा मुळ दगड म्हणजेच दुर्बीण दगड यााची आवश्यकता असते. वादीच्या जागेमध्ये घर बांधलेले आहे. त्या घराची क्षेत्र किती आहे हे मला सांगता येणार नाही. मी त्या घराचे मोजमाप घेतले नाही. नकाशामध्ये वादीचे घर दर्शविलेले नाही. त्या घरामध्ये किराणा दुकान आहे. माझ्याकडे गावठानची मोजणी नव्हती त्यामुळे मी घर नकाशामध्ये दर्शविली नाही. वादीचे घर किती क्षेत्रामध्ये आहे हे मला सांगता येणार नाही. मी किती बांद्या किती मोजल्या हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, घराचे मोजमाप घेतल्याशिवाय एकूण किती क्षेत्र आहे हे सांगता येणार नाही. वादीची जागा व नहरची जागा यामध्ये ढिवर याचे घर आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. वादीच्या घरापासून ९ फुट अंतरावर पुर्वेला नहर आहे. हे म्हणणे खरे नाही की, नहरचे मोजमाण केले

नसल्याने गट क्र. ३३६ ची मोजमाप मी चुकीचे केले आहे. गट क्र. ३३६ च्या दक्षिणेला रस्ता आहे. गट क्र. ३३७ हा गट क्र. ३३६ च्या पश्चिमेला असून तो टेकचंद बावनथडे याचा आहे. तो मोजणीच्या वेळी हजर नव्हता. मी क प्रत मध्ये मुळ अ प्रत नुसार गट क्र. ३३६ मधील फलक यंत्राचा मोजमाप दाखविलेला नाही. फलकयंत्राची मोजमाप क प्रत मध्ये दाखविलेले नाही. न्यायालयाने मला सिमांकन करण्याचे आदेश दिले होते. परंतू मी मिळकतीचे सिमांकन केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीच्या जागेचे योग्य प्रकारे मोजमाप केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीची १ आर क्षेत्र मुद्दामहून कमी दाखविले. मोजणी करीत असतांना वादी व प्रतिवादी हे हजर होते. त्याचवेळी गावठानातील इतर लोक देखील हजर होते. मी त्यांना बोलाविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी सोडून नकाशावर स्वाक्षरी केलेले इसम हे वादीच्या सांगण्यावरुन तेथे आले व स्वाक्षरी केली. हे म्हणणे खरे नाही की, मी जागेवर जावून मोजणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीच्या दुकानात बसून नकाशा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीच्या सांगण्यानुसार नकाशा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने वादीच्या १ आर क्षेत्रावर अतिक्रमण केलेले नाही. अतिक्रमण १ आर क्षेत्र हे पश्चिम दिशेला आहे. पश्चिम दिशेला अतिक्रमण असल्याचे नकाशामध्ये दर्शविलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा नकाशा तयार केला व खोटा अहवाल सादर केला. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

**आमगांव** **(समीर गोपाळ गुणारी)**
**दिनांक : ३०/०७/२०२५** **दिवाणी न्यायाधिश क. स्तर, आमगांव**

**उलटतपास प्रतिवादी तर्फे श्री एच. आर. गुप्ता वकील यांच्या मार्फत**

गावाकडील नात्याने किसनलाल माझा मामा लागतो. किसनलाल माझ्या घरापासून सातशे ते आठशे मिटर दुसऱ्या गल्लीत राहत होता. किसनलाल याला कोणता आजार होता मला माहित नाही. किसनलाल डॉक्टर कडे किती वेळा गेला हे मला माहित नाही. किसनलाल कोणत्या डॉक्टर कडे उपचार घेत होता हे मला माहित नाही. मी कधीही किंसनलाल याच्या सोबत डॉक्टरा कडे गेलेलो नाही. मी डॉक्टरांकडची चिठ्ठी पाहिलेली होती मात्र किसनलाल याला कोणता आजार होता मला सांगता येणार नाही. सदरची चिठ्ठी कोणत्या डॉक्टराकडची होती व कोणत्या तारखेची होती हे मी सांगु शकत नाही. मी डॉक्टराकडील दोन चिठ्ठा पाहिल्या होत्या. त्या दोन्ही चिठ्ठया एकाच दिवशी पाहिल्या होत्या. सदर चिठ्ठया मध्ये कोणत्या औषधांच्या नावे होती मला सांगता येणार नाही. मी हिरालाल गौतम यास ओळखतो. तो कोर्टात आलेला आहे. मी वारणलाल कटरे यास देखील ओळखतो, तो कोर्टात आलेला आहे. मी त्यांच्या सोबत आलेलो नाही, मी एकटाच आपल्या गाडीने आलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, हिरालाल गौतम व वारणलाल कटरे यांचे वादी मिनाबाई गौतम व यशवंत गौतम याच्या सोबत सन २०१३ सालापासून वाद आहे. हे मला माहित नाही की, कुसमनबाई, हिरालाल गौतम व वारणलाल कटरे यांच्या सोबत आली किवा कसे. मयत किसनलाल शेती करत होता. किसनलाल व मिनाबाई यांचे एकमेकांकडे जाणे येणे होते किवा कसे मला माहित नाही. किसनलाल याने ज्या दिवशी हक्कसोड पत्र सोडून दिले त्यादिवशी मी त्याच्या सोबत मी नव्हतो. सदर हक्कसोड पत्र कधी कोठे कोणत्या परिस्थितीत व कोणत्या मानसिक स्थीत लिहून दिले मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वारणलाल कटरे, हिरालाल गौतम, कुसमनबाई व मी संगणमत करुन प्रस्तुत केस चालवित आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे मिनाबाई गौतम हिच्या सोबत संबंध चांगले नसल्याने आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

श्रवणोत्तर स्वीकृत

आमगांव (एम.व्ही.जावळे)

दिनांक : १४/०२/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आमगांव

नि.दि.दा. क्र. ७/२०१३
मिनाबाई -वि.- किशनलाल
नि.क्र. ९१ खाली

**प्रतिवादी (प्रतिदावा) साक्षदार क्र. १ चे उर्वरीत सरतपास प्रतिवादी तर्फे वकील श्री वाय.एच.उपराडे यांच्या मार्फत शपथेवर सुरु**

माझ्या शपथपत्रातील संपूर्ण मजकुर खरा व बरोबर असुन, त्याच्या सत्यतेसाठी त्याखील मी सही केली आहे. दाव्यात नि.क्र.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास वादी तर्फे श्री एच. आर. गुप्ता वकील यांच्या मार्फत**

प्रविण राहांगडाले व यशपाल राहांगडाले यांनी प्रस्तुतचा दावा जागेबाबद दाखल केला आहे. प्रस्तुतचा दावा वादीने गट क्रमांक ४ मधील क्षेत्र ०.०४ जागेबाबद दाखल केला आहे. माझ्या कैफियत मध्ये काय लिहला ते मला माहित आहे. मी दाव्या संबंधीचे आमच्या कडील सर्व कागदपत्रे दाव्यात सामिल केले आहेत. मला दाव्यात आणखी साक्षदार दयायचे आहेत. वाद मिळकतीचा खसरा नंबर ४ आहे. सदर वाद मिळकतीच्या चारही बाजूला लोकांची घरे आहेत. वादीचा वाडा कोणत्या गट क्रमांकात आहे ते मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या घराच्या पुर्वीस आम्ही घर बांधले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या वाडया समोर गावातील मुख्य रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या वाडयाच्या उत्तरेकडील बाजूने एक रस्ता पाठीमागे जातो. मी जयश्री राहांगडाले व गोवर्धन गौतम यांना ओळखते, त्यांचे घरे मी पाहिलेले आहेत. सदर घरे पन्नास वर्षा पुर्वी पासुन आहेत.

हे म्हणणे खरे आहे की, वादीने पोलीस स्टेशन सालेकसा व देवरी येथील प्रांत अधिकाऱ्याकडे आमच्या विरुध्द केस दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, वादीने आमच्या विरुध्द गावातील तंटामुक्ती समितीकडे केस दाखल केली होती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी व प्रांत अधिकाऱ्याने आम्हाला सांगीतले होते की वाडया मागील बांधलेली झोपडी काढून घ्या. सदरची झोपडी आम्ही काढलेली नाही. प्रांत अधिकारी देवरी यांनी दिलेल्या निकालाविरुध्द मा.जिल्हा व सत्र न्यायालय यांच्याकडे क्रिमीनल रिव्हीजन दाखल केले होते ते प्रलंबीत आहे. वादीच्या वाडयाच्या पाठीमागे झोपडी बांधण्याची परवानगी ग्राम पंचायतने आम्हाला दिली नव्हती. वादीच्या वाडयाच्या पश्चिम दिशेला त्याची शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीची शेती ही त्यांच्या वाडयाच्या डाव्या बाजूला आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीस त्याच्या जमीनीस जाण्यासाठी वाडयाच्या पाठीमागून रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही वादीच्या जाणे येण्याच्या रस्त्यावर घर बांधलेले असल्यामुळे ग्राम

पंचायतने आम्ही परवानगी दिलेली नाही.  मी ज्या ठिकाणी घर बांधलेले आहे त्या जागेचा व घराचा मालकीचा कागज माझ्या जवळ आहे, ते घरी आहेत. सदरचे कागज मी पोलीस स्टेशन सालेकसा, प्रांत अधिकारी कार्यालय देवरी व जिल्हा व सत्र न्यायालय गोंदिया येथे का दाख्ल केले त्याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे घरे मी वादीच्या जागेत अतिक्रमण करुन बांधलेले आहे. साक्षदार स्वतःहून सांगते की, सरकारच्या जागेत बांधकाम केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, शांताबाई रहांगडाले ही वादीची आजी होती. हे म्हणणे खरे नाही की, वाडयाची जागा व त्याच्या पाठिमागील जागा वादीच्या मालकीची आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या वाडयाची जागा व त्याच्या आजूबाजूची जागा आबादी जागा आहे. वाडयाच्या पुर्वे दिशेला आमची झोपडी बांधलेली आहे. वादी त्याची बैलबंडी त्याच्या घराच्या समोरुन डांबरी रस्त्याने शेतात घेऊन जातो. हे म्हणणे खरे आहे की, पुढे जाऊन सदरची बैलबंडी वादी माझ्या घराच्या समोरच्या रस्ताने घेऊन जातो. आता मला नि.क्र. २० सोबत दाखल करण्यात आलेले एकूण सात फोटो दाखविण्यात आले ते माझे घराबाबद आहेत. सदर फोटोंना उलटतपासा संदर्भीत केल्याने **नि.क्र. ४४ ते ५०** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे घर वादीच्या येण्याजाणेच्या रस्त्यात बांधलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी कैफियत दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे व मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

श्रवणोत्तर स्वीकृत

आमगांव

(एम.व्ही.जावळे)

दिनांक : २६/०६/२०२४

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आमगांव